CAREERINDIA

**Code No. 07**

Total No. of Questions : 74 ]

Total No. of Printed Pages : 4 ]

**March, 2010**

# MARATHI

Time : 3 Hours 15 Minutes ] [ Max. Marks : 100

**सूचना :** i) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

ii) उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

I. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा : 1 × 10 = 10

1) रम्य ते बालपण

2) माझा आवडता खेळ

3) दूरदर्शन: शाप कि वरदान

4) आतंकवाद-एक समस्या

5) मी पंतप्रधान झालो तर ....

II. अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

6) अळजपुरची स्त्री कोणत्या यात्रेला जात होती ?

7) फाल्गुनरावानी भादव्याला कोणते काम सोपविले ?

8) साने गुरूजींना कोणत्या गोष्टींचा विषाद वाटत असे ?

9) आपल्या देशाचा फार मोठा समाज हजारो वर्षे कशापासुन वंचित होता ?

10) शेतीचा शोध कोणी लावला ?

11) हॉटेलमध्ये नोकरीला लागल्याबरोबर निवेदकाची सर्पप्रथम कोणाशी मैत्री झाली ?

12) कोणत्या घटनेनंतर युद्धाचा रंग पालटला ?

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा : 1 × 6 = 6

13) 'दक्षता'या पाठाचा तुमच्या भाषेत सारांश लिहा.

14) डॉ० आंबेडकराना बालपणी आलेले जातीय अनुभव लिहा.

15) सूर्यास्तानंतरच्या युद्धभूमी वरील वातावरणाचे वर्णन करा.

[ Turn over

www.careerindia.com

CAREERINDIA



क) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा : 2 × 4 = 8

16) गोविंदप्रभूच्या वागण्यातून आढळलेली संतत्वाची लक्षणे.

17) केसिक येथील धर्मसभेचा हेतू.

18) साने गुरूजी आणी निसर्ग सौंदर्य.

19) माध्यमांतर.

ड) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**चे ससंदर्भ स्पष्टीकरण करा : 2 × 3 = 6

20) ''ज्याची सत्ता त्याची लत्ता खल्लीच पाहीजे.''

21) माणसाचे मन शिक्षणाच्या संस्काराने अधिक संपन्न केल्याशिवाय समाज खऱ्या अर्थाने समाज बनत नाही.

22) ''पंडितांचा तांडा पंचाग चाळीत बसला आहे पण अनुभूतीशिवाय खऱ्या ज्ञानाची प्राप्ती होत नाही.''

23) ''मनात म्हटलं: झोपतो कसचा ? 'सौंदर्या'चा जबरदस्त अनुभव घेत होतो !''

III. अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची एक-दोन वाक्यात उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

24) नदीचा प्रवाह कुठे जाऊन मिळतो ?

25) माणसाला कोणती वासना असते ?

26) रूक्मिणीने सुदेव ब्राह्मणा बरोबर पत्र दिले, ते कोणत्या वृत्तात होते ?

27) कवीला कोणते पर्व संपले, असे वाटते ?

28) उजेडाची फुले कवीला कुणाच्या हाती ठेवायची आहेत ?

29) गतायुष्यातला हिशोब अर्थपूर्ण होतो की निरर्थक ?

30) संश्याना काय वर्ज्य आहे ?

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा : 1 × 6 = 6

31) 'कुणिं मारावें, कुणी मरावें' या कवितेत सामाजिक विषमता वाट्याला आलेल्या लोकांचे जगणे कसे असते ?

32) माती, नभ, पीक, पाखरे आणी झोपड़ी हे कवी ना० धों० महानीरांचे पंचप्राण कसे आहेत ?

33) 'तणकट' या कवितेचा सारांश लिहा.

क) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा : 2 × 4 = 8

34) जनाबाईने आत्मसाक्षीला दिलेले महत्व.

35) तेजाची लाट.

36) 'ठरविते किती मी' निसर्गाने नायिकेला केलेली मदत.

37) राखाडी रंगाचे ससे.

www.careerindia.com

CAREERINDIA



ड) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**चे संदर्भासह अर्थ स्पष्ट करा : 2 × 3 = 6

38) ''समजले आणी वर्तले । तेचि भाग्य पुरुष जाले ।
यावेगळे उरले । ते करंटे पुरुष जाले ॥''

39) प्रथम म्हणे वैदर्भी बाई । होते लहान मी कन्या ।
धन्या कृष्णकथा मज तेव्हांचि रूचे, न आवडे अन्या ॥

40) ''आश्वासित शब्दांवर आता माझाही विश्वास उरलेला नाही
प्रत्येक संदर्भातून दुर्गंधीच येत आहे:, तर काय करावे ?''

41) ''वळलो नाही प्लॅटफॉर्मवर अपघातातल्या स्ट्रेचरवरच्या चेहऱ्याकडे भयभीत.''

IV. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : 2 × 5 = 10

42) 'अंगणातील पोपट' मधील पोपट या लहानग्या चा दु:खद अंत.

43) बकसचे स्वार्थी चुलता व चुलती त्याला कसा त्रास देतात ?

44) 'कलिंगड' मधील रोहीणीचे व्यक्तिचित्र रेखाटा.

45) 'गोष्ट तिची' मधील नायिकेची गर्दीत मिसळून जाण्याची धडपड तुमच्या शब्दात लिहा.

V. अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर बातमी तयार करा : 1 × 5 = 5

46) 'व्यसनमुक्ती' या विषयावर मुख्य अतिथींनी मांडलेला विचार.

47) हुंड्यासाठी सुनेची जाळून हत्या.

48) महानगर पालिकेच्या स्वच्छताविभागातील कर्मचाऱ्यांचा अचानक झालेल्या संपामुळे नागरिकांची गैर सोय.

ब) कंसातील सूचनेप्रमाणे प्रश्न सोडवा. 5 × 1 = 5

49) मी बारावी परिक्षेत चांगले गुण मिळवणार. ( काळ ओळखा )

50) (राम ) ( कॉलेज ) जाऊन फीचे पैसे भरेल. ( सामान्य रूप तयार करा )

51) अपेक्षित, उपकार ( विरुद्ध अर्थी शब्द लिहा )

52) पाचशे रुपये ही देखील मोठी रक्कम आहे. ( नकारार्थी वाक्य लिहा )

53) नमस्कार, वारा. ( समानार्थी शब्द लिहा )

क) खालील वाक्य प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा : 5 × 1 = 5

54) राम राम ठोकणे.

55) काना डोळा करणे.

56) विडा उचलणे.

57) पंचप्राण असणे.

58) वाखाणणी करणे.



www.careerindia.com

CAREERINDIA



ड) रूढ इंग्रजी शब्दांना पर्यायी मराठी शब्द लिहा : 5 × 1 = 5

59) वर्किंग कमिटी

60) इनडोअर शूटींग

61) कम्यूनिटी

62) इनचार्ज

63) टेंपररी.

इ) अधोरेखित शब्दांच्या विभक्ती ओळखा : 5 × 1 = 5

64) लहानपणापासून तिला कलिंगडाची फार आवड.

65) पोपटचा ताप वाढतच होता.

66) ''अल्लाबकस म्हणव्यात मला !''

67) कलिंगड्यात घर करून राहायच.

68) मुलानों । भरपूर अभ्यास करा.

VI. उतारा वाचून खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

हास्य वदनाची थोरवी फारच थोड्या लोकांना कळते. नीतीमान असावे, असा उपदेश आपल्या कानी-कपाळी नित्य होत असतो. पण माणसाने नेहमी सुहास्यवदन असावे, असे कोणाला सांगताना ऐकू येत नाही. तसेच म्हटले तर कट्टर कर्मट माणसापेक्षा नेहमी हसतमुख असणारा मनुष्य अधिक योग्यतेचा असला पाहिजे. सकाळ-संध्याकाळ चार-चार घटका जपतप करणारा माणूस नेहमी आंबट चेहरा करून राहात असेल व प्रत्येक कामात चिडचिड करीत असेल, तर त्याच्या धर्ममार्तंडत्यामुळे समाजाचे व त्याचे कोणते कल्याण होईल ? उलट सदा हसत मुख असणारा मनुष्य केवळ आपल्या सानिध्याने लोकांचे दु:ख थोडेतरी हलके करील. आधीच कडू गोष्टींनी, यातनांनी गांजलेल्या या जगात दु:खी-कष्टी लोकांचा अंधार सर्वत्र भरलेला आहे. हास्याचे सूर्यकिरण या जगात दुर्मिळ आहेत. ते किरण जेथून उदय होतील त्या चेहऱ्याचे पावित्र्य, शेकडो धर्मक्षेत्रांहून अधिक समजले पाहीजे.

69) आपल्या कानीकपाळी कोणता नित्य उपदेश होत असतो ?

70) कट्टर कर्मट माणसापेक्षा कोणता मनुष्य अधिक योग्यतेचा असला पाहीजे ?

71) हे जग कशानी भरलेले आहे ?

72) जगात काय दुर्मिळ आहे ?

73) उताऱ्यास योग्य शीर्षक लिहा.

**किंवा**

74) तुमच्या गावातील रस्ता दूरुस्त करण्याबाबत ग्रामपंचायत अध्यक्षांना अर्ज करा.

www.careerindia.com